महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/12/2023 (सोमवार) दुपार

---

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत १४ किमी अंतरावर गौंडखैरी गुलमोहर बार समोर दिनांक २२/१२/२०२३ चे ०९.०० वा. ते १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मिलींद रामभाउ ढोके, वय ३५ वर्ष, रा. प्लॉट नं. २१ ओम साई कृपा निवास प्रिमियर होस्टेल सोसायटी लावा ता. नागपुर यांनी दिनांक २२/१२/२०२३ रोजी रात्री ०९/०० वा. दरम्यान गोंडखैरी गुलमोहर बार समोर हॅन्डल लॉक करून गाडी उभी करून समोरच्या ढाब्यावर जेवणाकरीता गेले होते नंतर फिर्यादी १०/०० वा. दरम्यान परत आल्यानंतर फिर्यादीची मोटर सायकल क्र. एम.एच. ४०/एए. —७१५४ जिची किंमत २२,३४३/— रू. होंडा पॅशन प्रो त्या ठिकाणी उभी नव्हती. कोणीतरी अज्ञात चोराने ती चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गंगाधर ठाकरे, मो. नं. ७२४९४७१८६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर